# Sebi rejects KOEL's bid over DFS disclosure

Neha Joshi
neha.joshi@livemint.com
MUMBAI

The Securities and Exchange Board of India (Sebi) has opposed an appeal filed by Kirloskar Oil Engines Ltd (KOEL) in the Securities Appellate Tribunal (SAT) challenging the regulator's advisory to the company to disclose the Deed of Family Settlement (DFS).

Sebi's advisory is an administrative order and an appeal against it is not maintainable, senior advocate Shiraz Rustomjee who appeared for the regulator said.

The DFS, a document signed in 2009, outlines the distribution of ownership, management and control of various listed and unlisted Kirloskar entities among different branches of the family.

The disclosure and implementation of the DFS between prominent members of the Kirloskar family and affiliated business entities have become a matter of dispute between the Kirloskar siblings since 2016.

Sanjay Kirloskar, chairman and managing director of Kirloskar Brothers Ltd, filed a complaint regarding the non-disclosure of the DFS by Rahul Kirloskar, executive chairman of Kirloskar Pneumatic Co. Ltd, and Atul Kirloskar, executive chairman of KOEL.

Sebi emphasized that under the amended Listing Obligations and Disclosure Requirements (LODR) regulations, all listed entities are required to disclose agreements affecting their management and control, even if they are not signatories to such agreements.

# IMF keeps India's GDP growth outlook at 6.5%

## Global growth is expected to remain stable, albeit lacklustre in 2025: IMF

Rhik Kundu
rhik.kundu@livemint.com
NEW DELHI

The International Monetary Fund (IMF) has maintained its India growth forecast unchanged at 6.5% for FY25 and FY26, in an update to its World Economic Outlook released on Friday.

However, in its latest quarterly update, the IMF said India's economic growth has slowed more than expected. "Growth in India also slowed more than expected, led by a sharper-than-expected deceleration in industrial activity," the IMF said.

On a calendar year basis, India's growth projections are 6.8% for 2025 and 6.5% for 2026, it added.

India's gross domestic product (GDP) grew in the September quarter at 5.4%, its slowest in nearly two years, according to data released by the ministry of statistics and programme implementation (MoSPI) in November.

Gross value added (GVA), which measures the total value of goods and services produced in an economy, grew by 5.6% in the September quarter, down from 7.7% in the same period last year. GVA growth in the first quarter was 6.8%.

On the expenditure side, private final consumption expenditure (PFCE), a proxy for private consumption, stood at 6% annually in the September quarter, down from a seven-quarter high growth of 7.4% in the preceding first quarter but above the 2.6% growth registered a year earlier.

To be sure, India remains one of the world's fastest-growing major economies.

The Union finance ministry expects a rebound in the second half of 2024-25 driven by stronger rural demand and increased government spending.

The IMF in its latest update said growth in India also slowed more than expected, led by a sharper-than-expected deceleration in industrial activity. REUTERS

The first advance estimate put out by the government earlier this month pegged GDP growth at 6.4% for FY25. That would be the slowest pace of growth in four years since the pandemic in FY21, when growth contracted 5.8%.

According to the latest IMF forecast, the world economy is expected to grow 3.3% in CY25 (calendar year 2025), up from its earlier estimate of 3.2%.

For India, the IMF presents data and projections on a fiscal year (FY) basis, while data for other countries are presented on a calendar year (CY) basis.

In CY26, the IMF expects the world economy to grow at 3.3%. The US economy is expected to grow at 2.7% in CY25, and 2.1% in CY26, and China is expected to grow at 4.6% in CY25 and 4.5% in CY26.

The IMF expects monetary policy rates of major central banks to continue to decline, though at different paces, reflecting variations in growth and inflation outlooks.

The RBI kept the benchmark repo rate steady at 6.5% in December, maintaining the level it last increased to in February 2023.

"Global growth is expected to remain stable, albeit lacklustre," the IMF report said.

"The overall picture, however, hides divergent paths across economies and a precarious global growth profile."

### CLOUDS LOOM

**INDIA's** growth projections are 6.8% for 2025 and 6.5% for 2026, on a calendar year basis, IMF said

**THE** country's GDP grew in Sep quarter at 5.4%, its slowest in nearly two years, according to data

**THE** first advance estimate put out by the govt earlier this month pegged FY25 GDP growth at 6.4%

# BUDGETING FOR GROWTH

EXPERT VIEW
ADITI NAYAR

Respond to this column at
feedback@livemint.com

India's growth outlook has turned less rosy of late, raising expectations around policy support from the Central government, with the Union budget just around the corner.

The First Advance Estimates (FAE) for FY25 released by the National Statistical Office (NSO) pegged GDP expansion at 6.4% for the fiscal. To be fair, this will exceed the growth of most large economies in the world. However, it is substantially lower than the 8.2% logged in FY24, and also a shade below the range of 6.5-7.0% that the Economic Survey had projected. Further, the outlook for FY26 appears increasingly clouded with sizeable risks stemming from global developments.

Given this context, the upcoming budget for FY26 assumes accentuated importance. While expectations will be high for the government to ensure some growth support to the economy, it will be equally critical to demonstrate continued fiscal consolidation.

One of the fiscal and growth nuances of FY25, a year of Parliamentary elections, has been the slowdown in government capital spending during the election quarter. We foresee a large miss to the tune of ₹1.4 trillion, relative to the capex target of ₹11.1 trillion, which had seemed quite ambitious at the get-go. Further, the lower growth impulse is contributing to a smaller-than-budgeted nominal GDP for the fiscal. On balance, we project the Centre to end up with a fiscal deficit of 4.8% of GDP in FY25 vis-à-vis the target of 4.9%.

From this base, the government could factor in an additional fiscal consolidation of 25-30 bps to 4.5% of GDP in FY26, an absolute amount of ₹16 trillion. It may not be prudent in a growth sense to restrict the fiscal deficit below 4.5% of GDP, as was mentioned in the medium-term path of the July 2024 budget. The fiscal space could be channelised to support economic activity in FY26 via raising the capital outlay.

Assuming a nominal GDP growth of ~10% for FY26, mildly higher than the NSO's estimate of 9.7% for FY25, and a tax buoyancy of ~1.1, we estimate gross tax revenue to rise by 10.5% in FY26.

However, we have pencilled in a modest decline in non-tax revenue in the fiscal, amid expectations that interest rate cuts in the major economies would weigh on the RBI's foreign earnings and, consequently, its dividend payout as compared with the record ₹2.1 trillion seen in FY25.

Our estimates suggest that the Centre will be able to raise its total expenditure by ~7% to ₹50.5 trillion in FY26. Within this, we believe the government should set aside ₹11 trillion for capex in FY2026, which works out to a healthy 3% of GDP, only a whisker below the 3.1% of GDP recorded in FY24 (as per the provisional estimates). While the absolute figure is similar to the budgeted level of ₹11.1 trillion for FY25, it is ~12.5% higher than the level of ₹9.7 trillion projected for the ongoing fiscal.

The aforesaid baselines suggest a net issuance of government securities (G-sec) of ~₹11.4 trillion, marginally lower than the ₹11.6 trillion estimated for FY25. However, after adding redemptions, the gross market issuances are pegged to rise to ₹15.1 trillion in FY26 from ₹14 trillion in FY25.

Should the government pencil in higher capex to support growth and reconcile to a larger fiscal deficit? Our estimates indicate that the Centre could incur additional capex of around ₹35,000 crore for every 10 bps of higher fiscal deficit. In our view, it may be more prudent to start the year with a fiscal deficit of around 4.5% of GDP. If capex kicks off promptly in Q1, and the target of ₹11 trillion appears likely to be achieved, the government could consider enhancing the allocation through an early supplementary, instead of starting the year with a higher borrowing figure.

> FY26 outlook is increasingly uncertain, with sizeable risks from global developments

Aside from capex, the government has several levers that it could use to prop up the economy, notwithstanding the fiscal constraints. For instance, operationalizing the measures to support credit flow to the MSME sector and the employment-linked incentive (ELI) schemes that were announced in the FY2025 budget would also support economic growth.

Additionally, modest tax relief to personal income taxpayers in form of raising tax slabs, or higher deductions, could provide some relief to urban households.

The combination of some relief on the income tax front, lower inflation particularly for food items, and a dip in EMIs on account of the hoped-for rate cuts would rejuvenate urban consumption in FY26, which has been quite uneven in the ongoing fiscal.

*Aditi Nayar is chief economist and head, research and outreach, Icra.*

# वैश्य ग्लोबल बिझनेस ग्रुपचा प्रथम वर्धापन दिन साजरा

**ठाणे :** वैश्य ग्लोबल बिझनेस ग्रुपचा प्रथम वर्धापन दिन सोहळा नुकताच धुमधडाक्यात आणि उत्साहात ठाणे येथील आर्य क्रीडा मंडळात साजरा झाला. याप्रसंगी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून विविध क्षेत्रातील उद्योजक वैश्य समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने हा नयनरम्य सोहळा पाहाण्यासाठी उपस्थित होते. या सोहळ्याचे उद्घाटन वैश्य समाज भूषण, उद्योजक आणि वैश्य को-ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष श्रीधर उर्फ भाई कामेरकर यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आला. यावेळी कायदेतज्ञ आणि उद्योजक विवेक माणगांवकर -विश्वस्थ वैश्य समाज मुंबई यांना वैश्य ग्लोबल बिझनेस ग्रुपचा पहिला उद्योग भूषण पुरस्कार या बिझनेस ग्रुपचे संकल्पक डॉ. संतोष कामेरकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास आशीर्वाद देण्यासाठी ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार दीपक केसरकर उपस्थित होते. त्यांनी या बिझनेस ग्रुपने बेरोजगारांना रोजगारासहित उद्योग निर्माण करण्याच्या संकल्पनेचे स्वागत करुन आयोजकांचे कौतुक केले.

## महत्त्वाचे

### खासगी बसमधून प्रतिबंधित 9 लाखांचा गुटखा जप्त

**शहापूर :** मुंबई- नाशिक महामार्गावर एका लक्झरी बसमधून वाहतूक प्रतिबंधित गुटखा वाहतूक केला जात होता. याबाबत मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या टिमने जप्त केला आहे. इंदोर येथून हा गुटखा ठाणे येथे नेला जात होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत साधारण ९ लाख रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. मध्य प्रदेशातील इंदौरमधून एका खासगी लक्झरी प्रवाशी बसमधून गुटख्याची वाहतूक करण्यात येत होती. गुटखा वाहतूक होत असल्याची माहिती ठाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या वाशिंद युनिटला मिळाली होती. या माहितीच्या आधारे मुंबई- नाशिक महामार्गावर पथकाने सापळा रचला होता. दरम्यान शहापूर तालुक्यातील खर्डी पोलिस ठाण्यात हद्दीत गोलभण येथे लक्झरी बस जात असल्याचे निदर्शनास आले. ९ लाख ३७ हजार २०० रूपये किंमतीचा गुटखा व ३० लाखांची लक्झरी बस असा एकूण ३९ लाख ४२ हजार २०० रूपये किंमतीचा माल जप्त करून ताब्यात घेतले आहे.

### क्रिकेटखेळाडू आणि अधिकाऱ्यांमध्ये मैदानावरून जुंपली

**अंबरनाथ :** अंबरनाथमध्ये क्रिकेट खेळणाऱ्या तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. मात्र, क्रिकेटसाठी कोणतेही हक्काचे मैदान नाही. शहरात नव्याने विकसित होणारी मैदाने आणि इनडोअर स्टेडियमची परिस्थिती पाहता भविष्यात क्रिकेटसाठी मैदानच उपलब्ध होणार नाही. फक्त तीन मैदाने शहरात असूनही तेथे क्रिकेटची सोय नाही सुविधा नाही. त्यामुळे अंबरनाथमध्ये नेताजी मैदान, गावदेवी मैदान, ग्रीन सिटी येथील मैदान अशी तीनच मैदाने आहेत. मात्र, या तीनही मैदानांमध्ये क्रिकेटची कोणतीही योग्य सुविधा नाही. इनडोअर स्टेडियम अंतर्गत मैदान खोदण्याचे काम केले जात असल्याने खेळाडूंनी या ठिकाणी अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र, या खेळाडूंना थेट गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याने खेळाडू संतापले होते.

# विशाल गवळीचे तिन्ही भाऊ ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातून तडीपार

## गवळी बंधुची गुन्हेगारी पार्श्वभूमी आली समोर

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणी मोठी अपडेट हाती आली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी विशाल गवळीच्या भावांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलिसांनी मोठी कारवाई करत त्याच्या कुटुंबातील सदस्यांना दणका दिला आहे.

कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलीस देखील ॲक्शन मोडवर आले आहेत. या प्रकरणातील आरोपी विशाल गवळी न्यायालयीन कोठडीत आहे. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर डीसीपी अतुल झेंडे यांनी मोठी कारवाई केली आहे. मुख्य आरोपी विशाल गवळीच्या तिन्ही भावांवरही कठोर पावले उचलत तिघांना तडीपार करण्यात आले आहे.

श्याम गवळी, नवनाथ गवळी आणि आकाश गवळी अशी या तिघांची नावे आहेत. या तिघांवर गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे जिल्ह्यातून तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. श्याम गवळी, नवनाथ गवळी आणि आकाश गवळी या तिघांविरोधात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे,बेकायदेशीररित्या शस्त्र जवळ बाळगणे, मालमत्तेचे नुकसान करणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहेत.

या तिघांवरील सर्व गुन्हे हे कोळशेवाडी पोलीस ठाण्यात दाखल आहेत. कल्याण पूर्व चक्की नाका परिसरात या तिघांची दहशत आहेत. हे तिघे भाऊ रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने तिघांना दोन वर्ष करिता ठाणे ,मुंबई उपनगर आणि रायगड जिल्ह्यातून तडीपार केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या गुन्हेगारांना तडीपार करत सातारा येथे सोडण्यात आले आहे. तसेच कोळशेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली आहे. तसेच लवकरच त्यांच्या विरोधात देखील कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

दरम्यान, कल्याण प्रकरणातील आरोपी विशाल गवळीच्या बुलढाण्यातून मुसक्या आवळल्या. त्यानंतर त्याच्या बायकोलाही अटक केली. विशाल गवळी सलूनमध्ये दाढी करत होता. त्याचवेळी पोलिसांनी विशाल गवळीच्या मुसक्या आवळत त्याला अटक केली होती.

## आमदाराला पुत्रशोक

# कुमार आयलानी यांच्या मुलाचे निधन

## लेकाच्या अचानक मृत्युने कुटुंबावर दु:खाचा डोंगर

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार कुमार आयलानी यांचे सुपुत्र धीरज आयलानी यांचे आज निधन झाले. ते प्रख्यात उद्योजक होते. गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली, अशी माहिती आयलानी कुटुंबाच्या निकटवर्तीयांनी दिली. धीरज आयलानी यांच्या निधनामुळे आयलानी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

कुमार आयलानी यांच्या राजकीय कारकिर्दीत धीरज यांचा मोठा वाटा होता. ते समाजसेवेसाठी सतत तत्पर असणारे उद्योजक म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या जाण्याने केवळ त्यांच्या कुटुंबीयांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे.

कुमार आयलानी हे भाजपचे ज्येष्ठ नेते असून उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातून ते भाजपच्या तिकिटावर तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आले आहेत. २००९ मध्ये त्यांनी पहिल्यांदा आमदारकी भूषवली. २०१४ मध्ये त्यांना पराभवाचा धक्का बसला. मात्र, २०१९ आणि २०२४ मध्ये ते सलग दुसऱ्यांदा उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातून कमळाच्या चिन्हावर आमदारपदी निवडून आले आहेत. भाजपच्या कल्याण मतदारसंघाच्या आमदार सुलभा गणपत गायकवाड यांनी धीरज आयलानी यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. "धीरज आयलानी यांच्या निधनाच्या दुःखद बातमीने मन हेलावून गेले आहे. त्यांच्या जाण्याने केवळ त्यांच्या कुटुंबीयांचाच नव्हे, तर समाजाचाही मोठा तोटा झाला आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# मेहुण्याला बलात्काराच्या खोट्या गुन्ह्यात अडकवणारी महिला गायब

## वकील भावोजीचा असा झाला पर्दाफाश

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापुरामध्ये एका महिलेने आपल्यावर नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलावून अत्याचार झाल्याचा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या तपासात धक्कादायक सत्य समोर आले असून मेव्हण्याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी उल्हासनगरातील एका वकिलाने हा सगळा कट रचल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी बदलापूर पूर्व पोलिसांनी गुन्हा दाखल करत दोन जणांना ताब्यात घेतले आहे. मात्र कट रचणारा वकील आणि अत्याचाराचा खोटा गुन्हा दाखल करणारी महिला फरार आहेत.

उल्हासनगरातील वकीलाच्या पत्नीने त्याच्यावर घरगुती हिंसाचाराचा गुन्हा दाखल केला होता. मात्र आपल्या पत्नीला भाऊ अभिषेक याची फूस असल्याचा संशय वकील सन्नी याला होता. त्यामुळे वकिलाने अभिषेक याला अत्याचाराच्या प्रकरणात अडकवण्याचा कट रचला. त्यानुसार उल्हासनगरातील एका महिलेला त्याने कटात सामील करून घेत संपूर्ण प्लॅन आखला होता. दरम्यान या प्रकरणात प्रथमेश नामक तरुणाने अभिषेकच्या नावाने स्नॅपचॅट अकाऊंट उघडत त्यावरून संबंधित महिलेशी चॅटिंग करण्यास सुरवात केली.

# नागरीप्रश्नांसाठी कुळगावाचा नगर परिषदेवर मोर्चा

प्रतिनिधी
■ बदलापूर

भ्रष्टाचार हटाओ, बदलापूर बचाओ, गोरगरीबांना घरे मिळालीच पाहिजे, अन्न, वस्त्र, निवारा, दे, रे, दे, सरकारा,फेरीवाल्याना त्रास देणे बंद करा, संविधान झिंदाबाद, लोकशाही झिंदाबाद, अशा गगनभेदी घोषणा देत काल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आर, के, आणि राष्ट्रवादी काँग्रेस ( s, p,) च्या वतीने विविध मागण्यासाठी कुळगाव बदलापूर नगर परिषदेवर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला,

मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रवक्ते महेश तपासे,हेमंत रूमने, अभिजीत सकट, तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आर, के, चे बदलापूर शहर अध्यक्ष अशोक गजरमल, भाऊ शिर्के, प्रेसेनजीत सोनावणे, लक्ष्मी वाघमारे, मिलिंद सकपाळ, बाळासाहेब पगारे यांनी केले. मोर्चाच्या वतीने महेश तपासे , हेमंत रूमने, अभिजीत सकट, अशोक गजरमल यांचे शिष्टमंडळ मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांना भेटून मागण्यांचे निवेदन दिले,व सविस्तर सकारात्मक चर्चा केली. योजनेत झालेला भ्रष्टाचार, अनधिकृत इमारती यांना भोगवटा प्रमाणपत्र, बेघरांना घरे,फेरीवाले यांचा प्रश्न, मुख्याधिकारी सोबत झालेला वृत्तांत महेश तपासे, हेमंत रूमने, अशोक गजरमल, अभिजीत सकट यांनी मोर्चेकऱ्यांसमोर कथन केला,

# कार्यालयीन वेळी सिडको कर्मचाऱ्यांनी भरवली गाण्यांची मैफल

## प्रकल्पग्रस्त नागरिकाने व्हिडियो काढत केला व्हायरल

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

सिडको नैना विभागाच्या अकाउंट विभागातील धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बेलापूरच्या सिडको विभागातील नैना कार्यालयात कामाकाजाच्या वेळेत गाण्यांची मैफिल रंगली आहे. कामाच्या वेळेत कर्मचाऱ्यांनी गाणी गायली आहेत. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

सिडकोच्या कार्यालयात सुरक्षा रक्षकांसमोरच कर्मचारी गाणी गाताना दिसत आहे. कर्मचारी माईकवर मोठ्या आवाजात गाण गाताना दिसत आहे. नैना प्रकरणी जाब विचारण्यासाठी गेलेल्या एका प्रकल्पग्रस्त नागरिकाने या घटनेचा व्हिडिओ काढला आहे. कर्मचाऱ्यांनी थेट ऑफिसमध्येची गाण्यांची अंताक्षरी सुरु केली आहे. त्यामुळे कामासाठी आलेल्या नागरिकांचे काम वेळेवर होत नसल्याचे दिसत आहे. यामुळे विंडोबाहेर उभे असलेल्या नागरिकांना वाट पाहावी लागते. त्यामुळे नागरिक त्रस्त झालेले दिसत आहे.

# दुसरे अखिल भारतीय महिला गझल संमेलन विष्णुदास भावे नाट्यगृहात रंगणार

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

गझल मंथन साहित्य संस्थेचे दुसरे अखिल भारतीय महिला गझल संमेलन दि. १९ जानेवारी रविवार रोजी नवी मुंबई येथे आयोजित केले आहे. ज्येष्ठ गझलकारा डॉ. सुनंदा शेळके यांची संमेलनाध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली आहे. या संमेलनाला महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित गझलकारा उपस्थित राहतील.

या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ गझलकारा उर्मिला बांदिवडेकर यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नामांकित गझलकारा ममता सिंधुताई सपकाळ व सुप्रसिद्ध गझलकारा हेमलता पाटील ह्या उपस्थित राहतील. डॉ. स्नेहल कुलकर्णी ह्या स्वागताध्यक्षा असतील. तसेच कार्यक्रमाला ज्येष्ठ गझलकार प्रमोद खराडे व डॉ. कैलास गायकवाड यांचीही उपस्थिती लाभणार आहे. या संमेलनात गझल मंथन साहित्य संस्थेतर्फे देण्यात येणारा मानाचा गझलक्रांती पुरस्कार सुनिता रामचंद्र यांना प्रदान करण्यात येईल. तसेच गझल सोबती पुरस्कार उद्योजक डॉ. कौतिक दांडगे यांना देण्यात येणार आहे. यंदाचे गझलयात्री पुरस्कार डॉ. मनोज वराडे, मानसी जोशी, सचिन इनामदार व प्रणाली मात्रे यांना देण्यात येणार आहेत. स्व. जबनाबेन सोमजी पाटील गझलध्यास पुरस्कार माधुरी खांडेकर यांना देण्यात येईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली मात्रे करतील. त्यानंतर विविध सत्रात गझल सुप्रिया हळबे व मनाली माळी करतील. हे गझल संमेलन विष्णुदास भावे नाट्यगृह, सेक्टर १६-ए, वाशी बस डेपो समोर, जुहू वाशी रोड, वाशी, नवी मुंबई येथे होणार आहे. या गझल संमेलनाचा गझल रसिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष देवकुमार गुमटकर, सचिव जयवंत वानखडे, सहसचिव उमा पाटील, संयोजक व मार्गदर्शक डॉ. शिवाजी काळे, प्रसिद्धीप्रमुख भरत माळी, संमेलन समिती प्रमुख मुकुंदराव जाधव, समन्वयक प्रदीप तळेकर, मुंबई जिल्हाध्यक्ष प्रणाली म्हात्रे तसेच मुंबई जिल्हा कार्यकारिणीने केले आहे.

# भिवंडी निजामपूर शहर पालिकेतर्फे अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेणाऱ्यांवर कारवाई

प्रतिनिधी
■ भिवंडी

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे टेमघर नं. स. 5/3, 5/5 व स.नं. 9/14 भिवंडी या ठिकाणी, टेमघर, पाहणी केली असता त्याठिकाणी विकासक श्री. हरेश तुकाराम पाटील व इतर-1 यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून मानपाचा जल वाहिनीला छिद्र पाडून 1 इंच व्यासाची एक पाईप लाईन टाळ अधिक सात मजली इमारतीकरीता अनधिकृतपणे घेतली असल्याने

*पाण्याची चोरी (व्यापारी 1 = रु. 78,000 × 5 वर्षे) रु. 3,90,000/- रस्त्याचे नुकसान (336 रनिंग मी. × 200 रु. प्रती मिटर) रु. 77,200/- पाईप लाईनचे नुकसान (रु. 1900/- × 5.5 मी) रु. 10,450/- असे एकूण रु. 4,67,650/- (अक्षरी रुपये चार लक्ष सदुसष्ट हजार सहाशे पन्नास मात्र)* नुकसान केल्यामुळे त्यांचे विरुद्ध शांतीनगर पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं. 2023 चे कलम 324(4), 324(5), 326(b) व 326(g) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई आयुक्त सो, यांचे आदेशान्वये कार्यकारी अभियंता संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता उद्धव गावडे यांचे अधिपत्याखाली विराज भोईर (पथक प्रमुख), नफीस मोमीन, सहाय्यक पथक प्रमुख, यांचे मार्फत करण्यात आली.

# अंबरनाथ तालुक्यातील महिलांसाठी शौचालये उभारणार

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

भारताच्या ऊर्जा मंत्रालयाच्यावतीने हाती घेतलेल्या ऊर्जा सक्षमीकरणाच्या अभियानात महत्त्वाची भूमिका बजावणारे मुंबई ऊर्जा मार्ग लि. व्यवस्थापन विविध लोकाभिमुख उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत आहेत. त्यांच्या माध्यमातून नुकतेच अंबरनाथ तालुक्यातील कासगाव जिल्हा परिषद शाळेला महिलांसाठी शौचालय बांधून देण्यात येणार आहे.

मुंबई महानगर क्षेत्रात - अतिरिक्त वीजपुरवठा मिळवून देण्यासाठी मुंबई ऊर्जा मार्ग लि. अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत असल्यामुळे या आस्थापनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कासगाव जिल्हा परिषद शाळेत १७० विद्यार्थी शिकत असून त्यापैकी ८३ विद्यार्थिनी आहेत. या शाळेत महिलांसाठी वेगळे शौचालय नव्हते. मुली तसेच महिला शिक्षक वृंद यांच्यासाठी अत्यंत गैरसोय होत होती. शाळा व्यवस्थापन समितीने मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड यांच्याकडे महिलांसाठीचे वेगळे शौचालय बांधून देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड कंपनीच्या वतीने विना विलंब या प्रस्तावास अनुमती दिली गेली. सध्या काम प्रगतीपथावर असून लवकरच या शाळेमध्ये आद्ययावत सुविधांनी सज्ज असे महिला सौचालय कार्यान्वित होणार आहे.

# नगरपालिकेकडून एफएसआय आणि टीडीआर समान प्रमाणात वापरण्याची सक्ती

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

अंबरनाथ नगरपालिकेने आता नव्या वर्षातील बांधकाम परवानग्यांसाठी एफएसआय जेवढा असेल तितकाच टीडीआर घेण्याचे सक्तीचे केले आहे. बांधकाम परवानगी घेताना मुळ चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात एफएसआय प्रीमियम एफएसआय आणि त्यावर अनुज्ञेय असलेला सहायक चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात अँसिलरी एफएसआय वापरला जातो. अशावेळी हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआरची मागणी केली जात नाही. त्यामुळे शहरात टीडीआरच्या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणी कमी झाली असून त्याचा विकास योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे अशी बाब अंबरनाथ नगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे टीडीआर निर्मिती थंडावली असून त्याचसाठी अंबरनाथ नगरपालिकेने आता नव्या वर्षातील बांधकाम परवानग्यांसाठी एफएसआयसह तितकाच समान टीडीआर घेण्याचे सक्तीचे केले आहे. याबाबतचा आदेश नुकताच पालिका प्रशासनाने जाहीर केला. एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीचा बांधकाम क्षेत्राला मोठा फायदा झाला. यात अनेक मुद्यांवर सुसूत्रता आली.

या नियमावलीनुसार रहिवासी बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये कमाल बांधकाम क्षमतेच्या मर्यादित वापरलेला बेसिक एफएसआय, प्रिमियम एफएसआय आणि टिडीआर या सर्वांवर ६० टक्के अँसिलरी एफएसआय घेण्याची तरतूद आहे. मात्र बऱ्याचशा बांधकाम परवानगी प्रकरणात मुळ एफएसआय आणि प्रिमियम एफएसआय तसेच त्यावर अनुज्ञेय असलेला अँसिलरी एफएसआय वापरुन बांधकाम परवानगी प्रकरणे सादर केली जातात. अशा प्रकरणात टीडीआर वापरुन अतिरिक्त एफएसआय मागितला जात नाही. त्यामुळे नगरपरिषद हद्दीतील टीडीआरचे महत्व कमी झाले असून या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणे कमी झाल्याची बाब अंबरनाथ नगरपालिकेच्या निदर्शनात आली आहे.